सातारा जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २१-०१-२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता स्थायी समिती, सभागृह जिल्हा परिषद सातारा येथे आयोजित केली होती. सदर सभेचा कार्यवृत्तांत.

| सभेचा दिनांक | सभेस उपस्थित असलेल्या सभासदांची नावे | सभेला उपस्थित असलेल्या इतर सभासदांची नावे | सभेचा संक्षिप्त कार्यवृत्तांत |
|---|---|---|---|

गुरुवार दिनांक २१- ०१-२०१६
दुपारी १-०० वाजता

मा.सर्व श्री/श्रीमती

१. सोनवलकर माणिकराव विठठल
२. सांळुखे प्रदिप ऊर्फ रवि सुर्यकांत
३. शिंदे शिवाजी तुकाराम
४. माळवे मानसिंग भिकू
५. मोरे कल्पना नानासो
६. भिलारे प्रल्हाद मारुती
७. देसाई अनिल शिवाजीराव
८. गुदगे शोभना सुरेंद्र
९. थोरवडे विद्या सतिश
१०. पाटील जालंदर अनंत
११. पिसाळ अरुणादेवी शशिकांत
१२. शेळके-पाटील आनंदराव शंकरराव
१३. चव्हाण सतिश नामदेव

मा.अध्यक्ष, जि.प.सातारा यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, स्थायी समिती सदस्य, सर्व खातेप्रमुख, यांचे सभेस स्वागत केले.

विषय क्र. १ — दिनांक २३/१२/२०१५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचा कार्यवृत्तांत वाचुन कायम करणे बाबत विचार करणे.

ठराव क्र. ५२७ — दिनांक २३/१२/२०१५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचा कार्यवृत्तांत वाचुन कायम करणेत आला.

सूचक :- मा.सौ.थोरवडे विद्या सतिश
अनुमोदक :- मा.श्री.शेळके-पाटील आनंदराव शंकरराव
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. २

दिनांक २३/१२/२०१५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

ठराव क्र. ५२८

दिनांक २३/१२/२०१५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेवून त्यांची नोंद घेणेत आली.

सूचक :- मा.श्री. चव्हाण सतिश नामदेव
अनुमोदक :- मा.सौ. पिसाळ अरुणादेवी शशिकांत
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ३

महाराष्ट्र शासनाकडून आलेले शासन निर्णय / परिपत्रके यांचे अवलोकन करणे.

ठराव क्र. ५२९

महाराष्ट्र शासना कडून प्राप्त झालेले खालील शासन निर्णय / परिपत्रके यांचे अवलोकन करणेत आले.

१.अवर सचिव (समिती), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग (ग्रामविकास) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १९ जनेवारी २०१६ अन्वये पंचायत राज समितीचा सातारा व नाशिक जिल्हा परिषदेला भेट व बैठकीचा कार्यक्रम .

सूचक :- मा.श्री.पाटील जालंदर अनंत
अनुमोदक :- मा. मा.सौ.शोभना सुरेंद्र गुदगे
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ४.-

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेणेगाव येथील मिळकत (मे.चेअरमन जिल्हा स्कूल बोर्ड) ता.सातारा यांच्या मालकीची जागा प्राथमिक आरोग्य केन्द्राची इमारत बांधकाम करणेसाठी जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद सातारा यांना दिड एकर (६० गुंठे) जागा हस्तांतरण करणेबाबत विचार करणे.

ठराव क्र. ५३०

मे. चेअरमन, जिल्हा स्कूल बोर्ड, सातारा यांचे नांवे असणारी गट नं.३८५ मधील ४ एकर ३ गुंठे जागेपैकी दिड एकर (६० गुंठे) जागा प्राथमिक आरोग्य केन्द्र, वेणेगाव ता.सातारा यांना वर्ग करणेसाठी शाळा व्यवस्थापन समितीने ठराव क्रं.२ दि.०३-०१-२०१४ अन्वये जागा हस्तांतरण करणेस शिफारस केली आहे. तसेच गट शिक्षण अधिकारी, सातारा यांनी दि.०४-१०-२०१४चे पत्रान्वये जागा हस्तांतरण करणेस प्रस्ताव सादर केला आहे . त्यानुसार मागणी केलेली दिड एकर (६०गुंठे )जागा प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत बांधकाम करणेसाठी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,सातारा यांचेकडे हस्तांतरीत करणेकामी, शिक्षण व क्रिडा समितीचे दि.३०-०७-२०१५ रोजी संपन्न

झालेल्या सभेत ठराव क्रं.३५२ अन्वये मंजूरी देणेत आलेने जिल्हा स्कूल बोर्ड सातारा यांचे नांवे असलेल्या ४ एकर ३ गुंठे जागेपैकी दिड एकर (६० गुंठे) जागा प्राथमिक आरोग्य केन्द्राची इमारत बांधकाम करणेसाठी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांना हस्तांतरीत करणेसाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस ही सभा शिफारस करीत आहे.

सूचक :- मा.सौ.गुदगे शोभना सुरेंद्र
अनुमोदक :- मा.श्री.शेळके-पाटील आनंदराव शंकरराव
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र ५ — मौजे वडगाव (जयरामस्वामी ) ता.खटाव जि.सातारा येथील शाळेच्या इमारतीची जागा ग्रामपंचायत वडगाव (जयरामस्वामी) यांना वर्ग करणेबाबत विचार करणे.

ठराव क्र.-५३१ — गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती खटाव (वडूज) यांचेकडील पत्र क्रं.पंसख/आस्था-४/१३५/२०१५ दि.०८-०५-२०१५ अन्वये, जिल्हा परिषद शाळा वडगाव (जयरामस्वामी) ता.खटाव यांना ग्रामपंचायतीने पिराचा मळा या ठिकाणी प्राथमिक शाळेसाठी ६ (सहा खोल्या) जागेसह बांधून दिलेल्या आहेत.सदरची जागा व इमारत जिल्हा परिषदेच्या नांवे करण्यात आली असून तशी नोंद ग्रामपंचायतीचा नमुना नं.८ च्या उता-यावर मालमत्ता क्रं.७५९ मध्ये घेणेत आली आहे.

मौजे- वडगाव (जयरामस्वामी) येथे मालमत्ता क्रं.६८ मधील जून्या ६ ( सहा) शाळा खोल्यांची इमारत मोडकळीस आल्याने सदर इमारत पाडण्यात आली आहे.या ठिकाणच्या जागेची जिल्हा परिषद शाळेस आवश्यकता नसल्याने, व शाळेंसाठी मौजे वडगाव (जयरामस्वामी) येथे जिल्हा परिषद शाळेला जागा व ६ खोल्यांची इमारत बांधून दिली असल्याने शाळा व्यवस्थापन समितीने दि.२३-०२-२०१५ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्रं.३६ अन्वये सदरची मोकळी जागा ग्रामपंचायतीस देणेबाबत मान्यता दिली आहे.

मौजे वडगाव (जयरामस्वामी) येथे ६ (सहा) खोल्यांची इमारत जिल्हा परिषद शाळेसाठी जागेसह दिली असून सदरची मिळकत जिल्हा परिषदेच्या नांवे करण्यात आली असल्याने, मिळकत क्रं.६८ मधील जून्या शाळेच्या इमारतीची मोकळी जागा ग्रामपंचायत वडगाव (जयरामस्वामी) यांना देणेकामी शिक्षण व क्रिडा समितीचे दि.२८-०८-२०१५ रोजी झालेल्या सभेत ठराव क्रं.३५८ अन्वये मान्यता देणेत आल्याने जिल्हा परिषद शाळा वडगाव (जयरामस्वामी) ता.खटाव शाळेची मिळकत क्रं.६८ मोकळी जागा ग्रामपंचायत वडगाव (जयरामस्वामी) यांना

हस्तांतरीत करणेसाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस ही सभा शिफारस करीत आहे.

सूचक :- मा.सौ.थोरवडे विद्या सतिश
अनुमोदक :- मा.श्री.चव्हाण सतिश नामदेव
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ६ सातारा जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाकडील मक्तेदारानी भरलेली रक्कम रुपये ,२०,५०९/- व्यपगत झालेने जिल्हा निधीतुन काढुन संबंधित ठेकेदाराना आदा करणेबाबत मंजुरी देणेकरीता विचार करणे

ठराव क्र. ५३२ सातारा जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाकडील मक्तेदार यांची कामाकरीता खाली दर्शविल्याप्रमाणे व्यपगत केलेल्या सुरक्षित ठेवी, चाचणी ठेवी व बयाणा रकमा जिल्हा परिषदेकडे भरणा केलेल्या आहेत. तसेच सदरच्या ठेवीस तीन वर्षापेक्षा जादा कालावधी झालेने त्या व्यपगत केलेल्या आहेत. या ठेवी जिल्हा निधीतुन काढुन संबंधित मक्तेदार यांना आदा करणेस महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम क्रमांक २१९ नुसार ही सभा मंजुरी देत आहे.

| अ. क्र. | मक्तेदारचे नाव | कामाचे नाव | रक्कम | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. ओंकार कंन्सट्रक्शन वडुज. | साठवण बंधारा पोगरवाडी ता सातारा | | |
| | | बयाणा रक्कम | १७७००/- | ८२/१६.३.१२ |
| | | बयाणा रक्कम | २६६००/- | ६६/१६.३.१२ |
| | | एकुण | ४४३००/- | |
| २ | चे भैरवनाथ म स स रणसिंगवाडी ता खटाव. | वि दु ग्रा त रणसिंगवाडी ता खटाव | | |
| | | चलन | २०४०/- | ५०/२१.१२.१० |
| | | १ ले अंतिम देयक सुरक्षा ठेव | २१३२/- | ६०/२८.४.११ |
| | | १ ले अंतिम देयक चा ठेव | ८५२५/- | ६०/२८.४.११ |
| | | एकुण | १२६९७/- | |
| ३ | मे राहुलदेव कंन्सट्रक्शन सातारा | मौ बिरमणी ता महा. जि सातारा | | |
| | | चलन सुरक्षा ठेव | ३०८४२/- | १०/२.३.१२ |
| | | चलन सुरक्षा ठेव | २०५६१/- | ११/२.३.१२ |
| | | १ ले देयक सुरक्षा ठेव | ३४७८६/- | ९०/१६.५.१२ |
| | | २ रे अंतिम चा ठेव | १९०७५/- | ७१/१७.११.१२ |
| | | एकुण | १०५२६४/- | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | श्री अजित वसंतराव पाटील ता जि सातारा | मौ मोरावळे को पा ब ता जावली जि सातारा | | |
| | | चलन | १८७४०/- | १२४/२९.११.०९ |
| | | एकुण | १८७४०/- | |
| ५ | श्री राजेंद्र बी देशमुख | मौ भरतगाव ता सातारा साठवण बंधारा | | |
| | | चलन | ३७५००/- | ३०/४.३.११ |
| | | चलन | २४७१५/- | ३०/४.३.११ |
| | | एकुण | ६२२१५/- | |
| | | | | |
| ६ | श्री टी डी सुतार सातारा. | साठवण बंधारा वळसगाव ता खटाव | | |
| | | चलन | २००००/- | १७०/३१.३.१२ |
| | | एकुण | २००००/- | |
| ७ | चे कृष्णाबाई म स स ता सातारा. | मौ लाखवड ता महा जि सातारा व बं व पाटचारी | | |
| | | १ ले अंतिम देयक सुरक्षा ठेव | १३५८२/- | ६७/२१.७.११ |
| | | १ ले अंतिम देयक चाचणी ठेव | ५४३२७/- | ६७/२१.७.११ |
| | | चलन | १४४००/- | ६०/१७.२.११ |
| | | एकुण | ८२३०९/- | |
| ८ | चे वरदविनायक म स स सातारा. | को प बं मौ गोगवे ता महा जि सातारा | | |
| | | १ ले अंतिम देयक सुरक्षा ठेव | १२४२२/- | ६७/२१.७.११ |
| | | १ ले अंतिम देयक चाचणी ठेव | ४९६८७/- | ६७/२१.७.११ |
| | | चलन | १२८७५/- | ५९/११.२.११ |
| | | एकुण | ७४९८४/- | |
| | | एकुण एकंदर | ४,२०,५०९/- | |

महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील २०९ (७) नुसार सदर रकमा तीन वर्षापेक्षा जादा झाल्याने व्यपगत करणेत आलेल्या आहेत. सदरच्या सुरक्षित ठेवी संबंधित मक्तेदार यांना आदा करणेस महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा सहिता १९६८ मधील कलम २१९ नुसार मान्यता देणेत येत आहे.

सूचक :- मा.सौ.थोरवडे विद्या सतिश
अनुमोदक :- मा.श्री.भिलारे प्रल्हाद मारुती
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ७ सामान्य प्रशासन विभाग १ व २ कडील लेखा विषयक नोंदवह्यांचे अवलोकन करणे.

ठराव क्र. ५३३ सामान्य प्रशासन विभाग १ व २ कडील ठेवणेत आलेल्या लेखा विषयक नोंदवह्यांचे माहे ऑक्टोबर २०१५ ते डिसेंबर २०१५ अखेरच्या नोंदवह्या अद्ययावत ठेवणेत आलेल्या आहेत. सदर नोंदवह्यांचे शासनाचे ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं.पंरास/१०७०४८०/२७ दिनांक ११/१/१९७९ नुसार अवलोकन करणेत आले.

१. किरकोळ रोकड नोंदवही नमुना नं. ४
२. प्राप्त धनादेश नोंदवही क्रं. ११
३. प्रदानार्थ मिळालेल्या बिलांची नोंदवही क्रं. १२
४. ठेव व तसलमात नोंदवही क्रं. ७३ व ७९
५. मालसाठा नोंदवही क्रं. ३३
६. जंगम मालमत्ता नोंदवही क्रं. ३२
७. वाहन रोज नोंदवही क्रं. ३७
८. खर्चाची नोंदवही क्रं. १४
९. पूर्वपत्रक नोंदवही क्रं. ३८
१०. दुरध्वनी नोंदवही क्रं. ९१

सुचकः- मा.श्री प्रल्हाद मारुती भिलारे
अनुमोदकः- मा.सौ.थोरवडे विदया सतिश
ठराव सर्वानुमते मंजुर

मा.सभापती, यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय मंजूर करणेत आले.

विषय क्र. ८ पशुवैदयकीय दवाखाना करंजखोप ता.कोरेगांव दवाखाना निवासस्थान बांधणे या कामाची सप्ततारा इंन्फ्रान्स्ट्रक्चर रा. सोळशी ता.कोरेगाव यांची निविदा रक्कमेपेक्षा कमी दराची र.रू.३५,०९,४७७/- ची निविदा स्विकृतीस मंजूरी देणेबाबत विचार करणे.

ठराव क्र. ५३४ पशुवैदयकीय दवाखाना करंजखोप ता.कोरेगांव दवाखाना निवासस्थान बांधणे या कामासाठी पहिल्या वेळी ६ मक्तेदारांच्या ई निविदा प्राप्त झाल्या. ६ मक्तेदाराची निविदा पात्र ठरल्याने त्यांचा दराचा लिफाफा उघडणेत आला.त्यामधील सप्ततारा इंन्फ्रान्स्ट्रक्चर रा. सोळशी ता.कोरेगाव यांची निविदा र.रू. ३५,०९,४७७ /- ची ई निविदा सर्वात कमी दराची असून स्वीकृतीस पात्र आहे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२६ नुसार व महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जल संधारण विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१२/ प्र.क्र. ६८०/वित्त-९ दिं.३१ जानेवारी २०१३अन्वये रु ३०,००,००१ ते र रु ५०,००,००० पर्यतच्या कामांच्या निविदा स्विकृतीचे अधिकार स्थायी समिती सभेस आहेत.त्या नुसार सदर कामाची

सप्ततारा इंन्फ्रान्स्ट्रक्चर रा. सोळशी जि.सातारा यांची सर्वात कमी दराची ३५,०९,४७७/- ची निविदा स्विकृतीस हि सभा मंजूरी देत आहे.

सूचक :- मा.सौ. पिसाळ अरुणादेवी शशिकांत
अनुमोदकः- मा.सौ.शोभना सुरेंद्र गुदगे
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ९ — औंध ता. खटाव जि. सातारा येथे जि. प. विश्रामगृह नवीन इमारतीत तळमजल्यासाठी फर्निचर करणे या कामाची मे. फिनिक्स किचन प्राय.लि., प्लॉट नं. १५, सर्व्हे नं. ८१/८२, अंबड गावाजवळ, एमआयडीसी, अंबड, जि. नाशिक यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) १३.५० टक्के कमी दराची र.रु. ४६,९७,८४२/- ची ई निविदा स्वीकृतीबाबत विचार करणे.

ठराव क्र. ५३५ — २०५९ सार्वजनिक बांधकामे, शासकीय इमारतींच्या परिरक्षण व दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदान (२०५९ २०९२) या लेखाशिर्षाखाली मंजूर औंध ता. खटाव जि. येथे जि. प. विश्रामगृह नवीन इमारतीत तळमजल्यासाठी फर्निचर करणे या कामाची मे. फिनिक्स किचन प्राय.लि., प्लॉट नं. १५, सर्व्हे नं. ८१/८२, अंबड गावाजवळ, एमआयडीसी, अंबड, जि. नाशिक यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) १३.५० टक्के कमी दराची र. रु. ४६,९७,८४२/- ची निविदा सर्वात कमी दराची असून ती स्वीकृतीस पात्र आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२६ नुसार व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए-२०१२/प्र.क्र. ६८०/वित्त-९ मंत्रालय मुंबई दि. ३१ जानेवारी २०१३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर कामाची मे. फिनिक्स किचन प्राय.लि., प्लॉट नं. १५, सर्व्हे नं. ८१/८२, अंबड गावाजवळ, एमआयडीसी, अंबड, जि. नाशिक यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) १३.५० टक्के कमी दराची र. रु. ४६,९७,८४२/- ची ई निविदा स्वीकारणेस हि सभा मंजूरी देत आहे.

सूचक :- मा.श्री प्रल्हाद मारुती भिलारे
अनुमोदकः- मा.श्री .पाटील जालंदर अनंत
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. १० — औंध ता. खटाव जि. सातारा येथे जि. प. विश्रामगृह नवीन इमारतीत पहिल्या मजल्यासाठी फर्निचर करणे या कामाची मे. फिनिक्स किचन प्राय.लि., प्लॉट नं. १५, सर्व्हे नं. ८१/८२, अंबड गावाजवळ, एमआयडीसी, अंबड, जि. नाशिक यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) १३.५० टक्के कमी दराची र.रु. ४६,५२,३८२/- ची ई निविदा स्वीकृतीबाबत विचार करणे.

ठराव क्र. ५३६ — २०५९ सार्वजनिक बांधकामे, शासकीय इमारतींच्या परिरक्षण व दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदान (२०५९ २०९२) या लेखाशिर्षाखाली मंजूर औंध ता. खटाव जि. येथे जि. प. विश्रामगृह नवीन इमारतीत पहिल्या मजल्यासाठी फर्निचर करणे या कामाची मे. फिनिक्स किचन प्राय.लि., प्लॉट नं. १५, सर्व्हे नं. ८१/८२, अंबड गावाजवळ, एमआयडीसी, अंबड, जि. नाशिक यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) १३.५० टक्के कमी दराची र. रु. ४६,५२,३८२/- ची निविदा सर्वात कमी दराची असून ती स्वीकृतीस पात्र आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२६ नुसार व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए-२०१२/प्र.क्र. ६८०/वित्त-९ मंत्रालय मुंबई दि. ३१ जानेवारी २०१३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर कामाची मे. फिनिक्स किचन प्राय.लि., प्लॉट नं. १५, सर्व्हे नं. ८१/८२, अंबड गावाजवळ, एमआयडीसी, अंबड, जि. नाशिक यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) १३.५० टक्के कमी दराची र. रु. ४६,५२,३८२/- ची ई निविदा स्वीकारणेस हि सभा मंजूरी देत आहे

सूचक :- मा.सौ.शोभना सुरेंद्र गुदगे
अनुमोदक :- मा.श्री.चव्हाण सतिश नामदेव
ठराव सर्वानुमते मंजूर.

वषय क्र. ११ — ग्रामपंचायत शिंगणापूर, ता. माण (दहिवडी) येथे यात्रेकरु कर आकारणी करणेस ग्रामपंचायत शिंगणापूर, ता. माण (दहिवडी) यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार पूर्व संमती देणेबाबत विचार करणे.

ठराव क्र. ५३७ — ग्रामपंचायत शिंगणापूर, ता. माण (दहिवडी), जि. सातारा यांनी दिनांक २५/०१/२०१३ ची मासिक सभा मधील ठराव क्र. २ व दिनांक २६/०१/२०१३ चे ग्रामसभेतील ठराव क्रमांक ५ नुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० अंतर्गत भाग-४ अन्वये मौजे शिंगणापूर, ता. माण (दहिवडी) येथे प्रति यात्रेकरु र.रु. २/- (अक्षरी रक्कम रुपये दोन फक्त) यात्रेकरुवर कर आकारण्यास मान्यता दिलेली असून यात्रेकरु कर आकारणीसाठी प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या स्थायी समिती सभेकडे मान्यतेसाठी सादर करणेस, सभेने एकमताने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार ग्रामपंचायत शिंगणापूर, ता. माण (दहिवडी) यांनी यात्रेकरुवर कर आकारणी करणेस स्थायी समितीची पूर्व मंजूरी मिळणेस विनंती केलेली आहे. ग्रामपंचायत शिंगणापूर, ता. माण (दहिवडी) यांनी सदर करामधून मिळणाऱ्या उत्पन्नातून शंभु महादेव तिर्थक्षेत्राला येणाऱ्या सरासरी वार्षिक १४ ते १५ लाख यात्रेकरुंसाठी शौचालय सुविधा, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, गावांतर्गत

दिवाबत्तीची सोय, गावांतर्गत रस्ते मजबुतीकरण करणे, औषध फवारणी करणे, स्वच्छतेसाठी जादा कर्मचारी नेमणे, व तिर्थक्षेत्राला भेटी देण्यासाठी आलेल्या यात्रेकरुमुळे स्थानिक राहिवाशी/ग्रामस्थांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे, इत्यादी सोईसुविधांवर खर्च करणेबाबतचा निर्णय घेतलेला आहे. याबाबींचा विचार करुन महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० अंतर्गत भाग-४ नियम नं ३६ नुसार असणाऱ्या तरतूदीचे काटेकोरपणे पालन करुन त्यानुसार ग्रामपंचायत शिंगणापूर, ता. माण (दहिवडी) यांना शिंगणापूर येथे भेट देणाऱ्या प्रति यात्रेकरुस रु. २/- (अक्षरी रक्कम रुपये दोन फक्त) या दराने कर आकारणी करणेस ही सभा संमती देत आहे. प्रस्तूत प्रकरणाबाबत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ खालील तरतूदीनुसार यात्रेकरुस कर आकारणी सुरु केलेल्या वर्षापासून शासनाकडून ग्रामपंचायत शिंगणापूर, ता. माण (दहिवडी) यांना देणेत येत असलेले यात्राकरांऐवजी सहाय्य अनुदान बंद करावे लागणार आहे. वरील बाबींचा विचार करुन ग्रामपंचायत शिंगणापूर, ता. माण (दहिवडी) यांना शिंगणापूर, ता. माण (दहिवडी) येथे भेट देणाऱ्या प्रति यात्रेकरुस रु. २/- (अक्षरी रक्कम रुपये दोन फक्त) या दराने कर आकारणी करणेस ही सभा संमती देत आहे.

सूचक :- मा.सौ.थोरवडे विद्या सतिश
अनुमोदक :- मा.श्री.भिलारे प्रल्हाद मारुती
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. १२ — देखभाल व दुरुस्ती अंतर्गत इंडिया मार्क ३ हातपंप काढुन इंडिया मार्क २ हातपंप बसविणे कामाचे ई-निविदेमधील आलेल्या कमीत कमी दरास मान्यता देणे बाबत विचार करणे.

ठराव क्र. ५३८ — सातारा जिल्हा परिषद कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्यासाठी विंधन विहिरीवर बसविणेत आलेल्या इंडिया मार्क ३ हातपंप काढुन इंडिया मार्क २ हातपंप किट बसविणेसाठी जिल्हा परिषद स्थायी समिती सभा दि. ०८/१०/२०१५ मधील ठराव क्र. ४९३ नुसार र.रु. ४९००७२२/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता व ई-निविदा प्रसिद्ध करणेस मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार दि. ०४/११/२०१५ रोजी ई-निविदा प्रसिद्ध करणेत आली व ई-निविदेनुसार मे. कृषीसेवा इलेक्ट्रीकल्स, सातारा यांचे आलेल्या कमीत कमी दरास महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२६ नुसार मान्यता देणेत येत आहे.

सूचक :- मा.श्री.पाटील जालंदर अनंत
अनुमोदक :- मा.सौ.शोभना सुरेंद्र गुदगे
ठराव सर्वानुमते मंजूर.